नांदेड जिल्ह्यामधील आठवडी बाजारातील रोख व रोख विरहित व्यवहारांचा ग्राहक व विक्रेता यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र शाखेंतर्गत वाणिज्य विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता सादर करावयाचा शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

खिल्लारे सिद्धांत बंडू

(एम.कॉम, बी.एड., सेट)

रा. मु.पो. असर्जन

ता.जि.नांदेड

मो. नं. 9673985024

ई-मेल :- siddhantkhillare05@gmail.com

मार्गदर्शक

डॉ.गोविंद पी. चौधरी

सहा.प्राध्यापक आणि वाणिज्य विभाग प्रमुख

पानसरे महाविद्यालय, अर्जापूर,

ता. बिलोली जि. नांदेड.

संशोधन केंद्र

प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड.

ऑगस्ट - 2023

नांदेड जिल्ह्यामधील आठवडी बाजारातील रोख व रोख विरहित व्यवहारांचा ग्राहक व विक्रेता यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास

1.1 प्रस्तावना (Introduction)

रोख व रोख विरहित व्यवहाराच्या पद्धती समजून घेण्यासाठी प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक या कालखंडाचा व त्यातील आर्थिक विकासाचा अभ्यास करावा लागतो. त्यामध्ये पूर्वीच्या काळी नाणी किंवा नोटा या चलनात नव्हत्या. त्या कालांतराने या आर्थिक व्यवहारात निर्माण झाल्याचे दिसून येते कारण पूर्वी सर्व महत्त्वाच्या वस्तू व सेवा या इतर महत्त्वाच्या वस्तू व सेवांची देवाण-घेवाण करून मिळविल्या जात होत्या. त्यानंतर या व्यवहारात अधिक विश्वसनीयता यावी व मानसिक आश्वासन म्हणून आर्थिक मूल्याची आवश्यकता निर्माण झाली आणि त्यातूनच नाणी किंवा चलने अस्तित्वात आली. पूर्वीपासून भारतात वस्तूंची खरेदी विक्री करण्यासाठी प्रामुख्याने नाणी वापरली जात असत. त्यानंतर इ.स. 1770 पासून कागदी रोकड वापरायला सुरुवात झाली व तेव्हापासून रोख किंवा नगदी पैसा हा दीर्घकाळासाठी राजा होता. नाणी व नोटा यांचा वापर करून रोख व्यवहार केला जातो, त्यास रोख व्यवहार असे म्हणतात.

सध्याच्या आर्थिक वातावरणात रोखविरहित व्यवहारांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. रोख विरहित व्यवहार ही वास्तविक रोख रकमेची गरज नसलेली देयके पार पाडण्याची एक पद्धत आहे आणि जागतिक अर्थशास्त्र आणि वित्त क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या नाविन्यपूर्णतेमध्ये एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. जेव्हा लोक वस्तू आणि सेवांच्या देवाण-घेवाणीसाठी मध्यस्थ म्हणून पैशाचा वापर करणे बंद करतात, तेव्हा त्यांचे वर्तन बदलते हे इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर पेमेंट किंवा नॉन इलेक्ट्रॉनिक पेमेंट चेक द्वारे किंवा दोन्ही प्रकारे पूर्ण केले जाऊ शकते. सध्याचे आर्थिक वातावरण सतत तांत्रिक अतिक्रमणाने वैशिष्ट्यकृत केले आहे. विशेषतः गेल्या दशकापासून हे बदल असंख्य प्रमाणात व अतिवेगाने होत असल्याचे दिसून येत आहेत. औद्योगीकरण आणि विकासाबरोबर कागदी नोटांचे स्वरूप हप्ते कार्ड आणि संगणकीकृत हप्त्यांमध्ये बदलले. चलनांचे विमुद्रीकरण हा एक पिढीचा वेगळा अनुभव होता. चलनांच्या विमुद्रीकरणाने कागदी चलनापासून रोखरहित व्यवहाराकडे प्रगतिशील बदल सुरू केला. जो इलेक्ट्रॉनिक व्यवहारावर अधिक लक्ष केंद्रित करतो. त्यामध्ये क्रेडिट/ डेबिट कार्डचा वापर व नेट बँकिंग आणि ऑनलाईन पेमेंटच्या व्यवहारात वाढ झाल्याचे दिसून येते. इंटरनेट बँकिंग ट्रान्सफर, एटीएम मनी ट्रान्सफर, आधार सक्षम पेमेंट सिस्टम(AEPS), युनिफाईड पेमेंट इंटरफेस (UPI) मोबाईल बँकिंग, ई-वॉलेट्स क्रेडिट

कार्ड, डेबिट कार्ड यासारख्या विविध रोख विरहित व्यवहार पद्धती आहेत, त्यास रोख विरहित व्यवहार असे म्हणतात. त्यांचा ग्रामीण व शहरी अर्थव्यवस्थेवर सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही अर्थाने परिणाम झाला आहे.

प्रस्तुत संशोधन विषय नांदेड जिल्ह्यामधील आठवडी बाजारातील रोख व रोख विरहित व्यवहारांचा ग्राहक व विक्रेता यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास असा आहे. यामध्ये जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या आठवडी बाजारांचा चालणारा दैनंदिन व्यवहार हा रोख स्वरूपात किंवा रोख विरहित स्वरूपात कशाप्रकारे पार पाडला जातो यांचा अभ्यास करावयाचा आहे.

1.2 संशोधन विषयाची निवड (Selection of Research Topic)

7 नोव्हेंबर 2016 रोजी पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी दि.8 नोव्हेंबर 2016 पासून 500 आणि 1000 च्या चलनी नोटा भारतीय चलनाचा भाग नसल्याचं जाहीर केलं. काळा पैसा व्यवहारातून बाहेर काढण्यासाठी सरकारने हा मोठा निर्णय घेतला होता. यामुळे रोख व्यवहारातून सर्वात मोठे चलन बाद झाले. परिणामी रोख विरहित व्यवहारांना चालना मिळाली. त्याचा परिणाम प्रत्येक भारतीय नागरिकाला जाणवला रोख विरहित व्यवहारासाठी अनेक पद्धतींचा वापर केला जाऊ लागला. यात डेबिट कार्ड, ऑनलाइन बँकिंग, डिजिटल बटवा, पेटीएम, ऑक्सिजन, यूपीआय नंबर, यु एस डी चेक, क्रेडिट कार्ड, प्रीपेड कार्ड यासारख्या साधनांच्या साह्याने रोख विरहित व्यवहार होऊ लागले. चलनांच्या विमुद्रीकरणाने कागदी चलनापासून रोखरहित व्यवहाराकडे प्रगतीशील बदलांकडे प्रवास सुरू झाला. जो इलेक्ट्रॉनिक व्यवहारावर अधिक लक्ष केंद्रित करतो. रोख विरहित व्यवहारासाठी अनेक पद्धतींचा वापर केला जाऊ लागला. त्याचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही अर्थाने परिणाम झाले आहेत. रोख विरहित व्यवहाराचे अनेक फायदे आहेत. उदा. व्यवहारात पारदर्शकता, कर चोरी रोखणे, बँकांकडे पैशाची उपलब्धता, ई-कॉमर्स सारख्या घटकांना चालना, डिजिटलायझेशन तंत्रज्ञानामुळे वेळेची बचत, देवाण-घेवाणच्या व्यवहारावर नियंत्रण, काळ्या पैशाला आळा इ. गेल्या काही वर्षांत कागदी कमी चलनांचा वापर करून बरीच प्रगती झाली आहे. 15 ते 60 वयोगटातील लोकांना रोख कमी व्यवहारांसाठी वेब, स्मार्टफोनवर प्रवेश आहे. ऐतिहासिक नोटाबंदीचा निर्णय, GST चे लागू होणे यामुळे सामान्य माणसाच्या आयुष्यात महत्त्वपूर्ण बदल सुरू झाले. यापूर्वीचे आणि नंतरचे आर्थिक व्यवहार व परिणाम वैशिष्ठ्यपूर्ण आहेत. आर्थिक व्यवहाराचे डिजिटायझेशन, मोबाईल/नेट-बँकिंगची उपयोगिता, सरकारला ग्रामीण जनतेच्या प्रतिसादाचे परीक्षण करेल असे

ॲप्स विशेषतः BHIM App, PhonePe, Paytm, Google pay, Bharat pay असे विविध ॲप्सद्वारे रोख विरहित व्यवहार मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत दिसून येतात. शहरी भागाबरोबरच काही ठिकाणी ग्रामीण भागात डिजिटल इंडिया झालेला आढळून येतो.

रोख विरहित व्यवहारांच्या फायद्यांबरोबरच या व्यवहारामुळे काही समस्या सुध्दा निर्माण झालेल्या आहेत. सायबर गुन्हे रोख विरहित अर्थव्यवस्थेसमोर मोठे आव्हान आहे. ज्येष्ठ नागरिक या व्यवहारासंबंधी अज्ञानी आहेत. अशिक्षित लोकांना रोख विरहित व्यवहार करता येणे शक्य नाही. बँकेतील रोख विरहित कार्यपद्धती किचकट आहे. काही ग्रामीण भागांमध्ये इंटरनेटचे जाळे अजून पोहोचलेले नाही. रोख विरहित व्यवहारासाठी आवश्यक असणारी जाणीव-जागृती निर्माण झालेली दिसून येत नाही. रोख विरहित व्यवहारासाठी आवश्यक असणारे स्मार्टफोन घेण्याची प्रत्येकाची ऐपत नाही.

आपल्या दैनंदिन गरजा आणि इच्छा पूर्ण करण्यासाठी सर्वात महत्त्वाचे साधन म्हणजे पैसा आहे. हा पैसा किंवा चलन हे देशाच्या सरकारद्वारे जारी केल्या जाते. त्यानंतर उत्पादन, वस्तू किंवा सेवांच्या मोबदल्यात त्यांची देवाणघेवाण केली जाते. आजच्या जागतिकीकरणाच्या युगामध्ये नवीन तंत्रज्ञान व जागतिक स्तरावर चालवला जाणारा व्यवसाय यासाठी कॅशलेस व्यवहार अधिक लोकप्रिय झाला आहे. त्यामुळे संशोधकाने ‘विषय नांदेड जिल्ह्यामधील आठवडी बाजारातील रोख व रोख विरहित व्यवहारांचा ग्राहक व विक्रेता यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास’ या विषयाची निवड केली आहे.

1.3 संशोधनाची उद्दिष्टे (Objective Of The Study)

कोणतेही संशोधन करण्यासाठी त्यास उद्दिष्टांची आवश्यकता असते. प्रत्येक संशोधन विशिष्ट हेतूने केलेले असते, म्हणजेच उद्दिष्टता होय. संशोधन विषयाचे उद्दिष्टे हे हेतूपूर्ती करणारे असतात. संशोधनाचा मुख्य गाभा, केंद्रबिंदू म्हणून उद्दिष्टांकडे पाहिले जाते. म्हणून खालील प्रमाणे उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

1. नांदेड जिल्ह्यातील आठवडी बाजारामध्ये रोख व रोख विरहित व्यवहार पद्धतींना आवश्यक असणाऱ्या ऑनलाइन सुविधांचा आढावा घेणे.

2. नांदेड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील आठवडी बाजारामध्ये रोख व रोख विरहित व्यवहारांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

3. नांदेड जिल्ह्यातील आठवडी बाजारामध्ये रोख विरहित व्यवहार पद्धतींचा ग्राहक व विक्रेता यांच्यावर होणाऱ्या परिणामांचा अध्ययन करणे.

4. नांदेड जिल्ह्यातील आठवडी बाजारामध्ये रोख विरहित पद्धतीमध्ये व्यवहारात निर्माण होणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

1.4 संशोधनाची गृहीतकृत्ये (Research Hypothesis)

संशोधनात गृहीतकांची मांडणी करणे आवश्यक आहे. कारण कोणत्याही विषयाचा अभ्यास करायचा असल्यास संशोधकाला प्रथम त्या विषयासंबंधी काहीतरी पूर्वज्ञान असावे लागते. या प्रारंभिक ज्ञानाच्या आधारे संशोधक आपल्या विषयासंबंधी कोणते तरी सामान्य अनुमान अथवा सिद्धांत बांधतो. हे अनुमान पुढच्या संशोधनासाठी संशोधकास मार्गदर्शक ठरतात. संशोधक आपले लक्ष आवश्यक तथ्यावर केंद्रित करतो. आपल्या संशोधनाची दिशा ठरवून त्यासंबंधी पुरावे गोळा करतो व संशोधनाच्या शेवटच्या चरणात आपले पूर्व अनुमान खरे आहे अथवा नाही याचा निष्कर्ष काढतो. म्हणजे हे कामचलाऊ पुर्वानुमानाला गृहीतकृत्ये अथवा उपकल्पना असे म्हणतात. यासंदर्भात गुड आणि हॅट यांनी गृहीतकृत्याची व्याख्या केली आहे. त्यांच्या मते, "परीक्षण म्हणजे असे विधान आहे की ज्याची सप्रमाणता ठरविण्यासाठी परीक्षण केले जाते आणि ते पुढील संशोधनासाठी उपयुक्त असते गृहीतकृत्ये निर्मिती हे संशोधनाचे अंतिम लक्ष नसून, त्यातून सत्य परिस्थिती शोधून काढणे. हे संशोधनाचे अंतिम लक्ष आहे."

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनाकरिता पुढील गृहीतकृत्ये मांडलेले आहेत.

1. नांदेड जिल्ह्यातील आठवडी बाजारातील ग्राहक व विक्रेते यांना ऑनलाईन पेमेंट प्रणाली अवगत नाही.

2. नांदेड जिल्ह्यातील आठवडी बाजारात रोख विरहित व्यवहारास आवश्यक असणाऱ्या ऑनलाइन सुविधांचा अभाव आहे.

3. आठवडी बाजारामध्ये रोख व रोख विरहित पद्धतीमुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत.

4. आठवडी बाजारामध्ये रोख विरहित व्यवहारापेक्षा रोख व्यवहार जास्त केला जातो.

5. ग्रामीण बाजारापेक्षा शहरी भागातील आठवडी बाजारामध्ये रोख विरहित व्यवहार जास्त होतो.

1.5 संशोधनाचे अध्ययन क्षेत्र (Scope Of The Study)

कोणत्याही संशोधनकार्यासाठी त्या संशोधना संदर्भात महत्त्वपूर्ण असणाऱ्या क्षेत्राची निवड करणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. कारण संशोधनाचे विषय हे खूप व्यापक स्वरूपाचे असतात. परंतु, त्या सर्व क्षेत्रातून माहिती संकलित करणे अशक्य असते. म्हणून अशावेळी संशोधकाला आपले संशोधनाचे क्षेत्र हे मर्यादित करून घेणे खूप महत्त्वाचे असते. कारण, संशोधन कार्यक्षेत्राची योग्य प्रकारे निवड केली तरच संशोधन कार्य व्यवस्थित पार पडू शकते अन्यथा त्यामध्ये अनेक समस्या निर्माण होतात. कार्यक्षेत्राचे भौगोलिक स्थान कोणते तेथील जनसमुदाय कसा आहे व आर्थिक बाजारपेठ या सर्व बाबी विचारात घ्याव्या लागतात. म्हणून कार्यक्षेत्राच्या निवडीस विशेष महत्त्वाचे स्थान आहे. संशोधनकर्त्याने अध्ययन क्षेत्राची निवड करण्यासाठी नांदेड जिल्हा निवडला आहे. या नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण 16 तालुके आहेत व या ठिकाणी लहान व मोठ्या प्रमाणात बाजारपेठा आहेत. त्या बाजारपेठा मधील ग्राहक व विक्रेते यांचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत अध्ययन क्षेत्राचे निवड करण्यात आली आहे.

1.6 संशोधनाची गरज (Need of Research)

आजच्या या आधुनिक युगात सर्व काही विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या आधारे अशक्य असणाऱ्या बाबी शक्य होताना दिसत आहेत. त्यामध्ये इंटरनेटच्या माध्यमातून जगभरातील व्यक्ती या एकमेकांना कोणत्याही ठिकाणाहून संपर्क साधू शकतात. तसेच 2019 पासून कोविड-19 या महामारीच्या नंतर ऑनलाइन प्रणालीचा वापर अधिक प्रमाणात दिसून येत आहे. कारण या महामारीच्या काळात व्यक्तींना घराबाहेर पडणे अशक्य होते. त्यामुळे त्यांना आवश्यक असणाऱ्या जीवनावश्यक वस्तू व सेवा या इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन प्रणालीचा वापर करून मिळविल्या जात असत. त्याच प्रमाणे आजच्या परिस्थितीतही सर्व नागरिक हे ऑनलाईन प्रणालीचा वापर करताना दिसून येत आहेत. परंतु सर्वच क्षेत्रांमध्ये काही या ऑनलाइन प्रणाली सुविधा उपलब्ध असतातच असे नाही. त्यासाठी पुरेशा प्रमाणात ऑनलाईन प्रणालीचे किंवा रोखविरहित व्यवहाराचे ज्ञान अवगत असणे आवश्यक असते. म्हणून शहरी व ग्रामीण भागात

आठवडी बाजारांमध्ये हे व्यवहार कशा प्रकारे चालतात. याचा अभ्यास करणे गरजेचे आहे व त्यांचा परिणाम तेथील व्यवहारावर कशा स्वरूपात होतो याचे अध्ययन करणे गरजेचे आहे.

1.7 संशोधनाचे महत्त्व (Imortance of Research)

1. सदरील संशोधनाचा रोख विरहित व्यवहार पद्धतीला प्रोत्साहन देण्यासाठी उपयोग होईल.

2. ग्रामीण भागातील व्यक्तींना दैनंदिन व्यवहारासाठी प्रत्येक वेळी तालुका किंवा शहरी भागात जाण्याची गरज भासणार नाही.

3. वेळ आणि श्रमाची बचत होईल. सर्वसामान्यांपर्यंत अध्ययवत तंत्रज्ञान पोहोचवण्यास मदत होईल.

4. आठवडी बाजाराला सकारात्मक चालना मिळेल व्यापारी व ग्राहक यांच्यातील व्यवहार सुलभ होईल.

1.8 संशोधनाची व्याप्ती (Scope of Research)

सदरील संशोधनामध्ये खालील बाबींचा अंतर्भाव करण्यात येईल.

1. सदरील संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील आठवडी बाजारांशी संबंधित असणार आहे.

2. सदरील संशोधनांमध्ये रोख व रोख विरहित व्यवहार पद्धतींचा अभ्यास केला जाणार आहे.

3. सदरील संशोधन हे नांदेड जिल्ह्याशी संबंधित असणार आहे.

4. सदरील संशोधनामध्ये व्यापारी व ग्राहक यांच्यातील व्यवहाराचा अभ्यास केला जाणार आहे.

1.9संशोधनाच्या मर्यादा (Limitations of Research)

1. प्रस्तुत संशोधनामध्ये केवळ आठवडी बाजारांचा अभ्यास करण्यात येईल.

2. प्रस्तुत संशोधनात केवळ नांदेड जिल्ह्यातील तालुकास्तरीय व ग्रामीण प्रमुख आठवडी बाजारपेठांचा अभ्यास करण्यात येईल.

3. प्रस्तुत संशोधनात केवळ ऑनलाइन व रोख व्यवहार या पद्धतींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

4. प्रस्तुत संशोधन हे केवळ सन 2022 ते 2025 या कालावधी पुरतेच मर्यादित असेल.

1.10 संशोधन आराखडा (Research Design)

संशोधन आराखड्याचे प्रत्येक संशोधनांमध्ये विशेष महत्त्व आहे. संशोधनातील एक प्रमुख पायरी म्हणून संशोधन आराखड्याकडे पाहिले जाते. संशोधन कार्याची सुरुवात करण्यापूर्वी पुढे येणाऱ्या समस्या आणि त्यावर मात करण्यासाठी काय करता येईल. याचा अगोदरच विचार करून ठेवला तरच संशोधन प्रक्रियेच्या वेगवेगळ्या पैलूंवर संशोधकास जास्त चांगले नियंत्रण ठेवता येते. संशोधन आराखड्याची उपयुक्तता स्पष्ट करताना एफ. एन. करलिंगर (F.N. Kerlinger) यांनी म्हटले आहे की, " संशोधन आराखडा संशोधनाची एक योजना संरचना आणि एक रणनीती आहे ज्याद्वारे संशोधन प्रश्नांची उत्तरे प्राप्त केली जातात आणि भिन्नत्व प्रसरणावर (Variance) नियंत्रण ठेवले जाते." संशोधकास आपल्या संशोधनात पद्धतशीर नियोजन करावे लागते, त्याची रूपरेषा ठरवावी लागते, संशोधन मांडणीचे स्वरूप निश्चित व स्पष्ट करावे लागते, तसेच संशोधनाचा आराखडा तयार करावा लागतो. संशोधन आराखडा तयार करताना त्यात विषय उद्दिष्ट अध्ययन क्षेत्र कालावधी नमुना निवड पद्धती ठरविणे, तथ्य संकलनाची साधने ठरविणे आणि संशोधन कार्याचा तपशील ठरविणे गरजेचे असते.

1.11 संशोधन पद्धती (Research Methodoogy)

प्रस्तुत संशोधनासाठी विविध संशोधन पद्धतींपैकी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

1.12 संशोधन जनसंख्या (Research Population)

प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या ही नांदेड जिल्ह्यातील आठवडी बाजारांमधील व्यवहार करणाऱ्या व्यक्तींची संबंधित असणार आहे. सदरील जनसंख्या ही अनिश्चित स्वरूपाचे असल्यामुळे गैरसंभाव्य नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला जाईल.

1.13 नमुना निवड (Sample Selection)

संशोधनात नमुना निवड पद्धतीस अत्यंत महत्त्व दिले आहे. संशोधन विषय निश्चित झाल्यानंतर संशोधकाला निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखत इत्यादी तथ्य संकलित करणाऱ्या तंत्राच्या साह्याने आपल्या संशोधन विषयाशी संबंधित अशी अनुभव मिश्रित तथ्य संकलित करावी लागतात. म्हणजेच अनुभव तथ्य मिळवण्यासाठी नमुना निवडीची गरज पडते. समूहाच्या सर्व सदस्यांचे अथवा एकमेकांशी संपर्क स्थापित करून माहिती गोळा करणे. या पद्धतीला जनगणना पद्धती असे म्हणतात. पण जनगणना पद्धती समूह लहान असेल तरच शक्य असते. दुसऱ्या पद्धतीत समूहाचे प्रतिनिधित्व सदस्य म्हणून संपूर्ण समूहाची माहिती देतो त्या पद्धतीला नमुना निवड म्हणतात.

1.14 न्यादर्श निवड पद्धती (Selection of Sampling Method)

प्रस्तुत संशोधनाचे न्यादर्श निवडताना गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीचा अवलंब करून सोयीस्कर नमुना निवड पद्धतीने नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक तालुका व त्या तालुक्यातील लॉटरी पद्धतीने निवडलेला ग्रामीण आठवडी बाजार अशा एकूण 16 आठवडी बाजारांचा व प्रत्येक आठवणी बाजारातून 20 आर्थिक व्यवहारांचा समावेश करण्यात येईल. अशाप्रकारे एकूण 640 आर्थिक व्यवहारांचा समावेश न्यादर्शांमध्ये करण्यात येईल.

1.15 तथ्य संकलन पद्धती (Fact Collection Methods)

प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलनाच्या दोन स्त्रोतांचा अवलंब संशोधक करणार आहे.

1.15.1 प्राथमिक स्त्रोत (Primary Data)

प्राथमिक स्वरूपातील माहिती गोळा करण्यासाठी प्रत्यक्ष निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखती इत्यादी स्त्रोतांचा वापर केला जाणार आहे.

1.15.2 दुय्यम स्त्रोत (Secondary Data)

दुय्यम स्त्रोतांमध्ये पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ, वेबसाइट्स, ऑनलाईन व ऑफलाईन वार्षिक अहवाल, शासकीय रेकॉर्ड्स इत्यादी आधारसामग्रीचा वापर करण्यात येईल.

1.16 संकलित तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन (Data Analysis and Interpretation)

कोणत्याही संशोधनात तथ्य महत्त्वाची असतात, कारण घटनांचे अध्ययन करूनच त्या घटना संबंधीच्या तथ्यांचे संकलन केले जाते. तथ्यांच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात. म्हणून तथ्यांचे शास्त्रीय पद्धतीने संकलन करणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये नांदेड जिल्ह्यातील आठवडी बाजारातील ग्राहक व विक्रेते यांच्याकडून संरचित प्रश्नावली, मुलाखत आणि निरीक्षणाद्वारे प्राथमिक स्वरूपाच्या संकलित तथ्यांचे विश्लेषण केले जाणार आहे आणि वर्तमानपत्रे, मासिके, पुस्तके, वेबसाईटस, संदर्भग्रंथ, ऑनलाईन व ऑफलाईन वार्षिक अहवाल इत्यादींचा दुय्यम स्त्रोतात समावेश आहे.

1.17 संख्याशास्त्रीय परिमाणे (Statistical Paramiters)

सदरील संशोधनासाठी संकलित माहितीचे विश्लेषण करून अर्थनिर्वचन करण्यासाठी शेकडेवारी, मध्यमान, प्रमाण विचलन, T परीक्षण इत्यादी संख्याशास्त्रीय परिमाणांचा वापर करण्यात येईल.

1.18 प्रकरणाची रूपरेषा (Structure of Topics)

प्रकरण पहिले :- प्रस्तावना

प्रकरण दुसरे :- संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे :- संशोधन पद्धती

प्रकरण चौथे :- तथ्यांचे संकलन व अर्थनिर्वचन

प्रकरण पाचवे :- संशोधन निष्कर्ष व शिफारसी

संदर्भग्रंथ सूची :

1. आगलावे प्रदीप, (2000), संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

2. कुंभोजकर जी.व्ही.,(1982), संशोधन पद्धती व संख्याशास्त्र, एम.व्ही. फडके अँड कं. प्रकाशन, कोल्हापूर.

3. ढगे एस.के., हासे सी.पी., (2011), संशोधन पद्धती, के एस पब्लिकेशन, पुणे.

4. पाटील वा.बा.,(2010), संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

5. पाटील एस.डी.,(2017), रोकडविरहित अर्थव्यवस्था / समाज - फायदे व तोटे, Review Of Research, ISSN:2249-894X, IMPACT FACTOR:5.2331(UIF), Vol.-6, ISSUE -12.

6. Kothari C.R., (2007), Research Methodology - Methods and Techniques, New Age International Pvt. Ltd. Publishers.

7. Sunil Kumar, (2017), Consumer Behaviour Towards Cashless Transactions, Ph.D Thesis Bahra University dist. Solan, Himachal Pradesh.

8. Babita Singla, Manish Bansal,(2015),"Consumers Behaviour Towards Debit Card Payment Mode While Shopping At Retail Stores" An International Journal of Engineering sciences, December 2015, vol.16 ISSN:2229-6913,(print), ISSN:2320-0332.

संशोधक
खिल्लारे सिद्धांत बंडू
संशोधन केंद्र
प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड.

मार्गदर्शक
डॉ.गोविंद पी.चौधरी
सहा.प्राध्यापक आणि वाणिज्य विभाग प्रमुख
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर,
ता. बिलोली जि. नांदेड.